KNOWLEDGE FLAME

E-ISSN: 3049-1541

International Multidisciplinary Research Journal (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal

Impact Factor: 5.292 https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# महान समाज सुधारक: महात्मा बसवेश्र्वर, रामास्वामी पेरियार आणि राजर्षी शाहू महाराज

**प्रा. डॉ. मनिष रघुनाथ करंजे**

**सहयोगी प्राध्यापक तथा मानद संचालक,**
**राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा व**
**प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर**
मो.नं.7888277210
Email- manish1970y@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज हा वैदिककाळात चातुर्वण्य व्यवस्थेवर आधारित होता. या चातुरर्वण्य पलीकडे असलेला तथाकथित समजला जाणारा अतिक्षुद्र वर्ग वर्षानुवर्षे शोषला गेला होता. त्याकाळात शुद्रातशुद्र समाज पशुवत जीवन जगत होता. या समाजाच्या उन्नतीसाठी देशभरातून अनेक महापुरूषांनी आपआपल्या परीने प्रयत्न केले. प्रामुख्याने महात्मा बसवेश्र्वर, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पेरियार रामास्वामी या सारख्या महापुरूषांनी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजात माणूस म्हणून जगण्याची चेतना जागृत करण्यासाठी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले. प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या जोखडातून दलित, उपेक्षित समाज घटकाला समानतेची वागणूक मिळवून देण्यासाठी 12 व्या शतकात बसवेश्वरांनी मोलाचे योगदान दिले. त्यांनी जगातल्या पहिल्या आंतरजातीय विवाह लावून रूढीप्रिय समाजाला धक्का दिला होता. तद्वतच राजर्षी शाहू महाराजांनी पुरोहित वर्गाच्या वर्चस्वातून दलित, बहूजन समाजाला त्याचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

तत्कालीन भारतीय समाजात धर्माच्या नावाखाली स्वैराचार चालला होता. तो थांबविण्यासाठी पेरियार रामास्वामी यांनी आपल्या लेखणी व वाणीद्वारे प्रयत्न केले. प्रस्तूत शोधनिबंधात महात्मा बसवेश्र्वर, राजर्षी शाहू महाराज आणि रामास्वामी पेरियर यांच्या विचार, कार्यकर्तृत्वाच अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

**महात्मा बसवेश्र्वर (1131-1167) :-**

मध्ययुगीन कालखंड हा सुलतानकाळ म्हणून ओळखला जातो. यात त्यांचे वर्चस्व होते. या काळातही भारतीय समाजात उच्च-निचता, स्पृश्य-अस्पृश्य, श्रेष्ठ-कनिष्ठ सामाजिक विषमता असतांनाही समानतेचे विचार मांडण्याचे महान कार्य यांनी केले. त्यांना लहानपणी बसव असे म्हणत.

KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
International Multidisciplinary Research Journal (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal
Impact Factor: 5.292 https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

**लहानपणीच देव नाकारला (एकेश्वरवाद) :-**

महात्मा बसवेश्वर एकेश्वरवादाचे पुरस्कर्ते होते. एकदा बसवेश्वराचे वडिल देव्हाऱ्यात असलेल्या देवांची पुजा करत होते. त्यावेळी लहान बसवेश्वर खेळून घरात आला व पाणी मागू लागला. त्यानंतर वडिलांनी पुजा होण्यापर्यंत त्यास थांबण्यास सांगितले. त्यावेळी त्याने हातात फावडी घेऊन घरासमोर सात-आठ ठिकाणी खड्डे खणू लागला. वडिलांची पुजा आटोपून ते बाहेर आलेत आणि विचारू लागलं. हे काय करतोस? मला पाण्याची तहान लागली आहे. तेव्हा पाण्यासाठी खड्डे करीत आहे. वडिल म्हणाले एवढे खड्डे करण्यापेक्षा एकच खड्डा केला तर पाणी लागेल त्यावर बसव म्हणाले. आपण ज्या पद्धतीने अनेक देवांची पुजा करू त्यांना प्रसन्न करण्यासाठी प्रार्थना करतो तर आपण ही जर एकाच देवाची प्रार्थना केली तर परमेश्वर प्रसन्न होईल. अशाप्रकारे हा एकेश्वरवादाचा सिद्धांत त्यांनी सोप्या उदाहरणावरून सांगितला. वीर शेव पंथाचा झेंडा हातात घेऊन त्यांनी वेगळा मार्ग स्विकारून शिव हा एकमेव परमेश्वर असून त्यांची पुजा करा. भूतदया पाळा, प्रेमाने परोपकार करा अशी शिकवण दिली. त्यांनी अहिंसा, सत्य, सदाचार, चारित्र, नीती चा आग्रह धरला.

बिज्जवळच्या राजाला एक ताम्रपट सापडला होता त्याचे वाचन करण्याचा प्रयत्न अनेक दरबारातील हुशार व्यक्तींनी केला पण कोणासही तो वाचता येत नव्हता. तेव्हा राजाने बसवयांना वाचण्यासाठी बोलावले राजाकडून दोन दिवसाची वेळ मागून त्यांनी ताम्रपटाचे बारीक अध्ययन करून राजास सांगितले की, आपल्या सिंहासनाखाली प्रचंड संपत्ती आपल्या पूर्वजांनी जनतेच्या कल्याणासाठी गाडून ठेवली आहे. तेव्हा आपण ही संपत्ती काढून समाजातील दीन, दुबळयांसाठी हीचा उपयोग करावा असे सांगितले. बसवेश्वरांनी धर्मजागृती अनुभवमंटप हे एक सामाजिक व सांस्कृतिक मुक्तपीठ होते.

**अनुभवमंटप :-**

धर्मजागृती कल्याणासाठी अनुभवमंटपाची स्थापना केली. चातुर्वण्य विरोध करून मनुष्य हा जन्माने श्रेष्ठ नव्हे तर कर्माने श्रेष्ठ बनतो. अंधश्रद्धा, कर्मकांड, पूजाअर्चा या तत्वांना मुठमाती देवून स्पृश्य, अस्पृश्य यांना यज्ञ यागाची गरज नाही हे ठामपणे सांगून त्या समाजाला धार्मिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. या सभामंडपात 700 पुरूष 70 स्त्रियांचा सहभाग होता. सदाचाराने व समतेने जीवन जगू इच्छिणाऱ्यांना या अनुभवमंटपात प्रवेश दिला जात असे.

**भारतातील पहिला आंतरजातीय विवाह :-** बसवेश्वर यांच्या मंटपातील विचारांचा प्रभाव समाजातील अनेक लोकांवर पडला. हरळ्या वरही पडला. त्याची अपार भक्ती पाहून

मधुवय्याहरळयाला. म्हणाला माझी मुलगी तू सून म्हणून करण्यास तयार आहेस का ? नको रे बाबा. ब्राह्मणाची मुलगी सुन म्हणून चर्मकार घरी आल्यास ब्राह्मण हे सहन करणार नाही. पण बसवेश्वरांनी दोघांना समजावून हरळयाचा मुलगा शीलवंत नावाचा मुलगा आणि मधवय्याची कलावती नावाची मुलगी यांच्यात मोठ्या थाटामाटात विवाह लावून दिला. हा विवाह म्हणजे मध्ययुगीन काळातील मानवतेच्या अतिउच्च शिखराकडे टाकलेले दमदार पाऊल होते. बसवेश्वरांनी सामाजिक विषमतेला प्रचंड धक्का दिला.

**बसवेश्वरांना हद्दपार :-**

बसवेश्वरांनी आंतरजातीय विवाह लावल्यामुळे ब्राह्मणांनी प्रचंड आग पाखड करून शीलवंत व कलावती यांना हत्तीच्या पायी बांधून मृत्यू इथंपर्यंत फरफटत ओढण्याची शिक्षा दिली. मधुवयास व हरळयायांना तुडवून त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली. त्यांचे बलिदान म्हणजे जातीव्यवस्था मोडून काढण्यासाठी 12 व्या शतकात झालेल्या आंदोलनातील एकमेव बलिदान होय. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी होती. बसवेश्वरांना हद्दपार करण्याचा कट रचून त्यांना हद्दपार केले. बसवेश्वरांनी क्रांतिकारी आंदोलन केले.

**वेदांवर खडग चालवीन. शास्त्रांना बेड्या घालेन**
**तर्काच्या पाठीवर चाबकाचे फटकार ओढेन**
**आगमांचे कान कापेन, महादानी कुंडलसगमदेवा**
**मादार चेन्नय्यचा लाडकापुत्र मी**

**पेरियार रामस्वामी 17 सप्टेंबर 1879 - 25 डिसेंबर 1973 :-**

रामस्वामी यांचा जन्म तामीळनाडू राज्यातील इरोडा या शहरात श्रीमंत घराण्यात जन्म झाला. रामस्वामींचे वडिल हे नामांकित उद्योगपती होते. घरातील वातावरण धार्मिक होते. घरात रोज धार्मिक विधी चालत असे रामस्वामी हे सर्व डोळस नजरेने पाहत त्यामुळे रूढी प्रथा परंपरा या गोष्टीवर त्यांना विश्वास नव्हता म्हणून लहानपणा पासूनच त्यांनी धर्माचा नावावर होत असलेल्या रूढी, अंधश्रद्धा यांना विरोध केला व अस्पृश्यवाड्यातील मुलांबरोबर खेळणे, त्यांच्या सोबत जेवण करणे, पाणी पिणे यात त्यांना काहीच वाटत नसे. त्यांना यातून मानसिक समाधान वाटत असे. पण धर्म वेड्या हे आवडणारे नव्हते. घरातून त्यांना लहानपणीच विरोध सुरू झाला. त्यांना घरीच शिक्षणाची व्यवस्था केली. पण त्यांच्या वागण्यात काहीच फरक पडत नव्हता. तेव्हा त्यांना वडिलांनी आपल्या उद्योगधंद्यात अडकवलं. ते आपल्या व्यवसायात उत्कृष्टकार्य करून लागले. व्यवसायात अनेक लोकांशी संबंध

आला आणि ज्ञानाच्या कक्षा अधिक रूंद झाल्या, समाजाशी होणाऱ्या संवादातून जनतेच्या समस्या हाल अपेष्टांचे आकलन रामस्वामींना झाले.

रामस्वामी यांना जेव्हा व्यवसायातून वेळ मिळत असे, त्यावेळी ते धर्मग्रंथ पुराणांचे वाचन करत. सुक्ष्मपद्धतीने पुराणातील वेडगळ विचारावर धर्मपंडितांसोबत चर्चा करून त्यांना निरूत्तर करीत आणि धर्माच्या नावावर कर्मकांड, अंधश्रद्धा या सर्वांचे खरे स्वरूप हळूहळू त्यांना लक्षात आले. त्यांनी आपल्या घरात धार्मिक गोष्टीला विरोध केला. उपवासाच्या दिवशी मांस खाणे इत्यादी तसेच आपल्या पत्नीच्या गळ्यातील मंगळसुत्र काढून टाकले. घरातील वातावरण तापल्यामुळे त्यांनी घर सोडले बनारस. उत्तरप्रदेश या राज्याची भ्रमंती केली व रामस्वामींनी स्वत:वर वैराग्य लादले. परंतु वैराग्यातून कोणताच मार्ग सापडणार नाही. यातून केवळ शरीराचा क्षय होईल. समाजहीत साधले जाणार नाही. तेव्हा त्यांनी पुन्हा घरी जाऊन सामाजिक चळवळीचे नियोजन करून समाजहीत साधावे हा विचार करून समाज हीत साधावे हा विचार करून ते घरी आल्यावर व्यवसायाचा प्रगती करून आपला नांवालौकीक वाढवला. आपल्या गावातील महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आणि महापालिकेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळून गावात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न :-**

रामस्वामींनी समाजाला लागलेल्या अस्पृश्यता या रोगाचे निर्मुलन करण्यासाठी महत्वाचे योगदान दिले. रामस्वामी यांच्या सामाजिक कार्याची चर्चा सर्वत्र होवू लागली. ही बातमी सेलम शहराचे नगराध्यक्ष श्री.सी.राजगोपालाचारी यांच्या पर्यंत पोहचली. या प्रामाणिक कार्यकर्त्यास आग्रह करून राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी आग्रह केला. काँग्रेसचेही कार्य स्वराज्य प्राप्त करणे व सामाजिक समता प्रस्थापित करणे असल्याने पेरियार यांनी सहभाग घेतला व सक्रिय कार्य करू लागले. गांधीजींची असहकार चळवळ, बहिष्कार चळवळ यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ताडी विक्रीवर बहिष्कार चळवळ सुरू झाल्यावर त्यांनी लोकांना ताडी पिण्यापासून परावृत्त केले व आपल्या शेतातील 500 ताडीची झाडे नष्ट केली व हजारो रूपयांचे आर्थिक नुकसान सहन केले. अस्पृश्यता निर्मुलनासाठी स्वत: सत्याग्रह चळवळीत कृतिशील भाग घेतला.

**वाय कोमचा सत्याग्रह :-**

केरळ राज्यातील वायकोमच्या राजाचा वाढदिवस दरवर्षी साजरा जात असे. इ.स.1924 मध्ये वाढदिवस साजरा केला जात होता. त्यावेळी झझावा या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना मंदिरा

जवळून जाण्यास मनाई होती. या प्रश्नावरून आंदोलन पेटले यांचे नेतृत्व काँग्रेसचे पुढारी व वकील श्री.जॉर्ज जोसेफ यांनी केले. पण त्यांना अटक करण्यात आली. जेल मधूनच त्यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व रामस्वामीयांना करण्यास सांगितले. रामस्वामी वायकोम येथे पोहचले. जेव्हा ते अस्पृश्यांच्या बाजूने व सरकार विरोधी बाजूने आंदोलन करण्यास आले हे कळताच ते सरकारी यंत्रणा गडबडून गेली.

या आंदोलनाचे आणखी एक कारण म्हणजे वायकोमच्या येथे मंदिराच्या भोवती कुंपण होते. तसेच कोर्ट-कचेरी होत्या व दुर्तफा बाजूने ब्राह्मण वस्ती होती व तेथून अस्पृश्यांना त्या रस्त्याने जाण्यास परवानगी नव्हती. एकदा इझावा जमातीचे बॅरिस्टर श्री.माधवन हे कोर्ट निमित्ताने उपस्थित राहणार होते. मात्र त्यांना ते अस्पृश्य कारणांवरून त्यांना ह्या रस्त्याने जाण्यास नकारण्यास आले. बॅरिस्टर माणसाला नाकारले तर सामान्य दलित समाजाची काय अवस्था असेल याची कल्पना आपणांस येते तेव्हा रामास्वामींनी आंदोलनाचे नियोजन केले. जनतेला स्फुर्ती मिळाली. परंतु रामस्वामींना अटक झाली. परंतु चळवळ अधिक प्रभावी झाली त्यांची पत्नी व भगिनी वायकोमच्या सत्याग्रहात भाग घेतला त्याची लवकरच सरकार सुटका करावी लागली व आंदोलन अधिक तापले तेव्हा त्रावणकांरच्या महाराजाचे निधन झाले व राज्यकारभाराची सूत्र महाराणीचे आपल्या हाती घेतले आणि रामस्वामीच्या सत्याग्रहाचा प्रभाव पाहून महाराणीने अस्पृश्य समाजाला रस्त्यावर जाण्यास परवानगी दिली. स्वामींनी अस्पृश्यांसाठी लढलेल्या हा लढा यशस्वी झाल्याने त्यांना मानसिक समाधान लाभले. वायकोमच्या सत्याग्रहाने संपूर्ण भारतभर सामाजिक विषमतेचा धक्का बसला याचा प्रभाव पडून सामाजिक जागृती निर्माण होण्यास मदत झाली.

**आरक्षण चळवळ :-**

रामस्वामी पेरियार यांना दलित समाजाच्या सामाजिक प्रगती बद्दल सहानुभूती होती. त्यांना सरकारी नोकरीमध्ये राखीव जागा असाव्यात यासाठी काँग्रेसमधील चळवळीतून त्यांनी प्रयत्न केले. इ.स.1920 मध्ये थिरूनेलवेली येथे काँग्रेसच्या अधिवेशनात राखीव जागा संबंधीची संकल्पना मांडली व राखीव जागाचा ठराव मांडण्यास सांगितले. परंतु तो ठराव फेटाळल्यात आला. 1922, 1923 मध्ये आरक्षणाची बाजू ठाम उचलून धरली.

1924 च्या थिरूवण्णामलाईच्या अधिवेशनाची अध्यक्ष स्वत: पेरियार होते. यावेळी जातीय आरक्षण किती आवश्यक आहे. हे त्यांनी पुन्हा प्रतिपादन केले. पण तेथे ही ठराव फेटाळण्यात आला. पेरियार रामस्वामीचे म्हणणे नीटपणे लोकांपर्यंत पोहचू शकले नाही म्हणून या विषयावर बेळगांव येथे ब्राह्मणेत्तरांचे एक शिष्ट मंडळ गांधीना जाऊन भेटले. राखीव जागांचे महत्व पटवून दिले होते. परंतु

KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
International Multidisciplinary Research Journal (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal
Impact Factor: 5.292 https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

त्याचा ही उपयोग झाला नाही. त्यामुळे कॉंग्रेसला रामराम ठोकला आणि जस्टीस पार्टीत सक्रिय सहभाग घेवून राखीव जागासाठी प्रयत्न केले व मागासवर्गीयांना राखीव जागा मिळाल्या. त्यात पेरियार यांचा सिंहाचा वाटा आहे.

**स्त्रीयांच्या हक्कासाठी कार्य :-**

भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीयांना दुय्यम स्थान होते. चूल आणि मूल या पलिकडे स्त्रीचे स्थान शून्य होते. तेव्हा स्त्रीयांची प्रगती झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. स्त्रीयांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी त्यांनी स्वाभिमान चळवळ (Self Respect Movement) सुरू करून स्त्री ही पुरूषाची गुलाम नाही हे भाषाणातून आपल्या लेखनातून वारंवार सांगितले व लग्नानंतर स्त्रीने गळात मंगळसूत्र घालणे म्हणजे गुलामगिरीचे प्रतिक आहे. असे ठामपणे सांगितले तसेच स्त्रीयांचे दोषही त्यांनी स्पष्टपणे मांडले. चांगले दागिने घालण्यापेक्षा स्त्रीयांची आपली क्षमता पात्रता वाढवावी असे सांगितले.

स्वाभिमानी विवाह पद्धती सुरू केली. विवाह हा एक करार आहे आणि तो सर्व विधींना फाटा देवून स्त्री-पुरूषांना एकमेकांवर प्रेम प्रकट करण्याच्या अटी मान्य करून लग्न केले पाहिजे. असे विवाह विषयी त्यांनी विचार मांडले. या विवाहास शासकीय मान्यता मिळवून रूढीवाद्यांना धक्का दिला. याबरोबरच रामास्वामींनी कुटूंब नियोजन संकल्पना, शिक्षण विषयक संकल्पना मांडून विद्यार्थ्यांना समतेने वागण्याचे शिक्षण द्या. दुसऱ्यांवर दया करण्याचे शिकवा. त्यांना विश्वबंधूत्वाचे शिकवण द्या. त्यांना राष्ट्रनिष्ठा शिकवा असा मोलाचा संदेश दिला.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज (16 जून 1874 - 6 मे 1922) :-**

चौथ्या शिवाजी महाराजांची राणी आनंदीबाई यांनी 17 मार्च 1884 रोजी यशवंतरावांना विधिवत दत्तक घेतले. कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव 'शाहू छत्रपती' म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आरूढ झाले. ब्रिटीश पॉलिटिकल एजंट कर्नल रीव्हज यांनी दत्तक विधान पार पडून शाहू छत्रपती कोल्हापुरचं 'राजे साहेब' झाल्याचे जाहीर केले व त्यांना उच्च शिक्षणासाठी राजकोटला राजकुमार कॉलेजमध्ये पाठवले.

**सर फ्रेझर यांचा विचारांचा प्रभाव :-**

शाहू महाराजांवर त्यांचे शिक्षक फ्रेझर यांचा प्रभाव पडला. त्यांनी शाहू महाराजांच्या जीवनाला आकार दिला. आपला शिष्य जनतेच्या कल्याणाची काळजी वाहणारा आदर्श राज्यकर्ता कसा तयार होईल याकडे त्यांनी लक्ष पुरविले होते. सुसंस्कृतपणा, दूरदृष्टी, व्यावहारिक शहाणपणा, दूरदृष्टी अखंड

KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
International Multidisciplinary Research Journal (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal
Impact Factor: 5.292 https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

सावधानता, कर्तव्यनिष्ठा, न्यायप्रियता, संयम शिस्त, संकटात न डगमगण्याची वृत्ती, उदारबुद्धी इत्यादी गुणविशेष त्यांच्या निर्माण व्हावेत असे शिक्षण दिले. या गुणांवर राजर्षी शाहू महाराज यांनी एक आदर्श समाज सुधारक म्हणून कार्य केले आहे.

**वेदोक्त प्रकरण सामाजिक परिवर्तनाचा लढा :-**

महाराष्ट्रात धार्मिक विषमता असल्याचे अनुभव स्वत: शाहू महाराजांना ऑक्टोबर 1899 मध्ये अनुभव आला. महाराज कार्तिक महिन्यात नेमाने पंचगंगा नदीत स्नानास जात. सोबत त्यांचे नातेवाईकही होते. स्नान चालु असतांना सोबत 'रामशास्त्री भागवत' होते. स्नानाच्या वेळी नारायण भटजीस मंत्र म्हणावयास सांगितले. तो वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र उच्चारत होता. हे महाराजांच्या राजाराम शास्त्रींनी लक्षात आणून दिले. भटजी नारायण म्हणजे की, "वेदोक्त मंत्रांचा हक्क फक्त ब्राह्मणांनाच आहे आणि शुद्रांना पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात." एका राजाला ही वागणूक तर सर्व सामान्य जनतेचे काय ? सामान्य जनतेवर केवढा अन्याय होत असेल हे महाराजांच्या लक्षात आलं. या विरूद्ध महाराजांनी सामाजिक बंडखोरी केली व आपल्या कोल्हापुर संस्थानात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अविरत प्रयत्न केले.

**आरक्षणाचा जाहीरनामा :-**

26 जुलै 1902 मध्ये शाहू महाराजांनी अभूतपूर्व असा आरक्षणचा क्रांतीकारी जाहीरनामा प्रसिद्ध केला. कोल्हापूर संस्थानांमध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांना शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. सरकारच्या इच्छेप्रमाणे समाजातील दीन दलित यांच्या स्थितीत बदल व्हावा. मागासलेल्या घटकांनी अभ्यास करावा म्हणून सरकारने प्रयत्न करावे आणि त्यांना नोकरी व्यवसायाकरीता आरक्षण असणे योग्य होईल हे लक्षात घेऊन 50% जागा मागासलेल्या लोकांसाठी आरक्षीत असावा. ज्या कार्यालयात मागासलेल्या वर्गाचा सहभाग कमी आहे तेथे त्या पूर्ण भराव्यात. भारताच्या इतिहासात आजपर्यंत कोणत्याही संस्थानिकाने आपल्या गरीब जनतेसाठी जेवढी काळजी घेतली नसेल. एवढी काळजी शाहू महाराजांनी घेतलेली दिसते.

**वसतिगृह चळवळ:-**

महात्मा फुले व त्यांच्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी अविरत प्रयत्न केलं.

**विद्येविना मती गेली | मती विना नीती गेली ||**
**नीतीविना गती गेली | गतिविना वित्त गेले ||**
**वित्तविना शूद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले ||**

अशा शब्दात महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या अभावी बहुजन समाजाची दुर्दशा झाली हे 'शेतकऱ्याच्या आसुड' या छोटेखानी पुस्तकाच्या उपोद्घातात नमूद केले. भारतातील शेकडो वर्ष बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. या वंचित समाजाला हक्काचे निवास व भोजन व्यवस्था असावी म्हणून महाराजांनी मराठे, जैन, मुसलमान समाजास वसतिगृह काढलेत.

**मराठा बोर्डिंग - 18 एप्रिल 1901 :-**

कोल्हापुरात मराठा बोर्डिंग या पहिल्या वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. यासाठी त्यांना भास्करराव जाधव, दाजीराव विचारे व जिवाजीराव सावंत यांनी मोठे सहकार्य केले. या वसतिगृहाचे नांव 'मराठा' असे असले तरी यात मराठ्याशिवाय मुसलमान, शिंपी, कोळी, माळी, साळी, गवळी अशा सर्व समाजातील मुलांना तेथे आश्रय दिला जात होता. यातून सर्व समावेश असा हा विचार होता. या वसतिगृहासाठी महाराजांनी प्रारंभी रू.550/- अनुदान दिले. याशिवाय रू.2,000/- वार्षिक उत्पन्न मिळेल एवढी जमीन दिली. शिवाय रू.47,000/- स्थायी देणगी देवून या वसतिगृहाचा पाया बळकट केला. या वसतिगृहाचे पहिले विद्यार्थी म्हणून पी.सी. पाटील होते.

**1901 जैन बोर्डिंगची स्थापना केली :-**

**मुस्लीम बोर्डिंगची स्थापना :-**

अस्पृश्य जातीच्या मुलांसाठी महाराजांनी 'मिस क्लार्क' होस्टेल नावाचे वसतिगृह सुरू केले होते. या वसतिगृहामधून अनेक उच्च विद्याविभूषित बहुजन समाजाची पहिली पिढी बाहेर पडली व बहुजन समाजातील तरूणांमध्ये आत्मविश्वास वाढून शिक्षणाप्रती आस्था निर्माण झाली.

**अस्पृश्यांच्या शिक्षणांसाठी प्रयत्न :-**

दलित समाजातील दुर्बलतेचे कारण महाराजांच्या लक्षात आले होते. या समाजास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे कठीण होते. पण ते शिक्षणानेच होईल हा विश्वास महाराजांना होता. म्हणून दलित समाजाच्या उन्नतीसाठी वसतिगृहाबरोबर त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी शाळांची गरज आहे म्हणून अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी नावाची संस्था स्थापन केली. यात अडचण म्हणजे अस्पृश्य समाजात शिक्षणाबद्दल अनास्था होती. ती दूर करणे हे कठीण काय होते ते त्यांनी यशस्वीपणे पार पाडले 1898 मध्ये कोल्हापूर संस्थानात 5 शाळा होत्या. त्यातील विद्यार्थी संख्या 168 होती. 1907-08 साली अस्पृश्य शाळांची संख्या 16 व विद्यार्थी संख्या 416 झाली. पुढील चार वर्षात म्हणजे 1912 साली अस्पृश्य शाळांची संख्या 27 व विद्यार्थी संख्या 636 झाली. महाराजांच्या भगीरथ प्रयत्नांनी शाळांची

संख्या तर वाढली. परंतु विद्यार्थी संख्या ही वाढली. केवळ संख्याच वाढली नाही तर हळूहळू गुणवत्ताही वाढू लागली ती आज प्रचंड प्रमाणात वाढलेली दिसून येते.

**अस्पृश्य मुलास वेदाची संथा :-**

वेदोक्त प्रकरणाचा परिणाम महाराजांच्या हृदयात सतत सलत होता. म्हणून अस्पृश्यांना उच्चवर्णियांच्या बरोबरीने आणून ठेवण्याचे कामी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचा निर्णय घेतला होता. या अस्पृश्य समाजास धार्मिक शिक्षण देण्याची योजनाही आखली होती. या कामी त्यांनी आर्यसमाजचे स्वामीचा उपयोग करून घेतला. त्यांनी आपल्या पद्धतीने त्यांना आर्य करून उपनयन केले व प्रथमत: त्यांना वेदांची संधी दिली. यामुळे मुलांच्या अंगची आपण हलके ही भेकडपणाची वृत्ती जाऊन आपण ही इतरांबरोबरीने आहोत हा आत्मविश्वास निर्माण झाला. हायस्कूलमध्ये मुले इतरा बरोबरीने वागू लागले. त्यामुळे शाळेतील अस्पृश्यता नाहीशी झाली. अस्पृश्यांच्या मुलांचे उपनयन संस्कार करून त्यांना वेदाची संधी देणारा आणि त्यांना ब्राह्मणाच्या तथाकथित दर्जावर आणून सोडणारा शाहू महाराज हा भारताच्या इतिहासातील पहिला राजा होता. असे इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांनी आपले मत नोंदवले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तूत शोध निबंधात महात्मा बसवेश्र्वर, रामास्वामी पेरियार, राजषी शाहू महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाच्या अभ्यासातून असे सिद्ध होते की, मध्ययुगात बसवेश्र्वरांनी उच्चनिच्च भावना नाकारून सर्व मानव समान आहेत व पहिला आंतरजातीय विवाह लावून आधुनिकतेकडे समाजाला नेण्याचा प्रयत्न केला. तसेच शाहू महाराज व पेरियार यांनीही सामाजिक विषमतेत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला न्यायहक्क मिळवून देण्यासाठी आपल्या सत्तेचा उपयोग केला व समाजात आत्मविश्वास निर्माण केला. समाजातील सर्व प्रकारच्या विसंगतीच्या विरोधात कार्य केले व लोककल्याणकारी काळजी वाहिली. त्यामुळे नियत निबंधातील समाज सुधारक हे खऱ्या अर्थाने कृतिशील विचारवंत व सुधारक होते हे सिद्ध होते.

**संदर्भ साधने :-**

1. सुर्यवंशी किसन, 'परिवर्तनाचा दिपस्तंभ : बसवेश्र्वर, 3 जून 2011, पृ.6
2. कित्ता, पृ.7
3. कित्ता, पृ.12
4. कित्ता, पृ.14

5. सरवदे भीमराव, 'पेरियार रामस्वामी', ऑक्टोबर 1998, पृ.34
6. कित्ता, पृ.37
7. पवार जयसिंगराव भाऊसाहेब, 'राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य', प्रशासक-महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, 1 जानेवारी 2012, पृ.33
8. कित्ता, पृ.62
9. चंपानेरकर प्रदीप प्रकाशक यांनी घडवलं सहस्रक-13 आवृत्ती-जानेवारी 2009